# समकालीन भारत-आसियान संबंध : संवाद आणि विकास

डॉ. संदीप बी. काळे

राज्यशास्त्र विभाग प्रमुख

यशवंत महाविद्यालय, सेलू जि. वर्धा

**सारांश (Abstract) :**

भारताच्या विकासासाठी महत्त्वाच्या समुहांपैकी आसियान समूह अत्यंत महत्त्वाचा आहे. कारण या समुहाबरोबर भारताचे सर्व पातळीवर 1990 पासून चांगले संबंध राहिले आहेत. आसियानच्या माध्यमातून भारताचे आशियाई राष्ट्रांसमवेत संवादामध्ये सातत्याने प्रगती झाली आहे. 2014 मध्ये भारताने आपल्या 'लूक ईस्ट धोरणाचे' रुपांतर '□क्ट इस्ट धोरण' मध्ये करण्याचे जाहीर केले. भारताची आसियानची क्षेत्रिय भागीदारी, संवाद भागीदारी अनुक्रमे 1992, 1996, 2002, 2012 आणि 2014 मध्ये सुरु झाली. आसियान क्षेत्रीय मंच हा आसियान सुरक्षा संवादाचा मंच म्हणून कार्य करतो.

आसियान संघटना ही आंतरराष्ट्रीय स्तरावरील महत्त्वाची संघटना म्हणून उदयाला आली असून भारताच्या आसियान देशांशी सागरी व भूसीमा संलग्न आहेत. महासत्ता म्हणून उदयाला येणाऱ्या भारताला या देशासोबतचे संबंध संवादात्मक आणि व्यापक व्यापारी दृष्टिकोनातून निर्माण करणे आवश्यक आहे. युरोपीय देशांसह अमेरिका स्वदेशीय नारा लावत असताना भारताला आंतरराष्ट्रीय व्यापारात महत्त्वाचा सेवा क्षेत्राच्या विकासासाठी आसियान संघटनेचा मोठा फायदा होत आहे. भारत व पूर्वेकडील किंवा आग्नेयकडील देशांदरम्यान सदैव चांगले संबंध राहिले आहेत. पंतप्रधान गुजराल यांचे 'लूक ईस्ट धोरण' आणि मोदी यांचे '□क्ट ईस्ट धोरण' हा त्याचाच भाग आहे. राष्ट्राला स्वत:च्या सर्वांगीण विकासासाठी शेजारी देशांसोबत चांगले राजनयिक संबंध असणे चांगलेच असते. आसियान देश हे छोटे व लष्करी आणि आर्थिकदृष्ट्या कमकुवत असल्यामुळे त्यांची वैयक्तिक ताकद कमी आहे; तेव्हा या देशांना चीनसारख्या बलाढ्य देशाविरोधात भारताचा सदैव आधार राहिला आहे. आसियान राष्ट्रांचे भारताशी संबंध दृढ झाल्यामुळे पाकिस्तान आणि चीनचा राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर दबावगट निर्माण करण्यास भारतास सहकार्य मिळणार आहे. भौगोलिक आणि सांस्कृतिक पार्श्वभूमी समान असणाऱ्या आसियान राष्ट्रांचा भारतामधील उद्योगधंदे आणि रोजगार वृध्दीमध्ये निश्चितपणे लाभ मिळणार आहे.

**बीज संज्ञा (Key-Words) :**

आसियान संघटना, भारत-आसियान संबंध, भारत आसियान संवाद, भारताचे □क्ट इस्ट धोरण.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे (Objectives of Research Paper) :**

1. समकालीन भारत-आसियान संबंधाचे विश्लेषण करणे.

2. समकालीन भारत-आसियान यांच्यातील संवादाचे विवेचन करणे.

3. भारताच्या परराष्ट्र धोरण संदर्भात आसियान संघटनेचे कार्य स्पष्ट करणे.

**प्रस्तावना (Introduction) :**

भारताच्या विकासासाठी महत्त्वाच्या समुहांपैकी आसियान समूह अतिशय महत्त्वाचा आहे. कारण या समुहाबरोबर भारताचे सर्व पातळीवर 1990 पासून चांगले संबंध राहिले आहेत. त्या अनुषंगानेच भारत, अमेरिका, जपान आणि ऑस्ट्रेलिया या चार देशाचा समुह तयार होताना दिसत आहे. जेणेकरुन चीन, उत्तर कोरियासारख्या आंतरराष्ट्रीय कायदाबाह्य रणनीती आजमावणाऱ्या राष्ट्रांवर दबाव निर्माण करता येणार आहे, याचे फलित म्हणजे चीनने दक्षिण चीन समुद्राबाबतचा विवाद चर्चेने सोडविण्याचे संकेत दिले आहेत. भारतीय अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने परराष्ट्र धोरणाची सकारात्मक दृष्टीने पाऊल पडत असल्याचे समकालीन व्यवस्थेत निदर्शनास येते, याचा देशातील रोजगार वृध्दी आणि सर्वसमावेशकता प्राप्त होण्यास मदत मिळणार आहे. नोव्हेंबर 2014 मध्ये नाय पाय ताव (म्यानमार) येथे पार पडलेल्या 12 व्या आसियान-भारत परिषद आणि 9 व्या ईस्ट आशिया परिषदेमध्ये भारताने त्याच्या 'लूक ईस्ट धोरणाचे' रुपांतर □क्ट क्षेत्रिय भागीदारी, संवाद भागीदारी, परिषद पातळी भागीदारी आणि व्युहात्मक भागीदारी अनुक्रमे 1992, 1996, 2002 आणि 2012 मध्ये सुरु झाली. आसियान क्षेत्रीय मंच हा आसियान सुरक्षा संवादाचा मंच म्हणून कार्य करतो. भारत 1996 पासून या मंचाच्या वार्षिक सभेला उपस्थित राहत आला आहे. भारत-आसियान व्यापार आणि गुंतवणूक संबंध उत्तरोत्तर वाढत असून आसियान भारताचा सर्वात मोठा चौथा भागीदार समूह आहे. सन 2015-2016 मधील भारताचा आसियानशी असणारा एकुण व्यापार सन 2016-2017 च्या तुलनेत 65 अब्ज डॉलर्सवरुन 70 अब्ज डॉलर्स इतका वाढला आहे. तसेच 2015-2016 मध्ये असणारी निर्यात 2016-2017 च्या तुलनेत 25 अब्ज डॉलर्सवरुन 30 अब्ज डॉलर्स इतकी झाली आहे. 2000 ते 2016 दरम्यान भारतामध्ये आसियान समुहाद्वारे 49.40 अब्ज डॉलर्स इतकी परकीय प्रत्यक्ष गुंतवणूक (FDI) झाली आहे. तर 2007 ते 2015 या कालखंडामध्ये भारतामधून आसियान समुहामध्ये 38.672 अब्ज डॉलर्सची विदेशी गुंतवणूक झाली आहे. 1 जुलै 2015 मध्ये भारत आसियान दरम्यान सेवा आणि गुंतवणूकीसंदर्भात करार झाला आहे. भारत आणि आसियान दरम्यान व्यापारामध्ये खाजगी क्षेत्राचा समावेश करुन घेण्यासाठी सन 2003 मध्ये आसियान-भारत व्यवसाय मंडळाची (AIBC-ASEAN India Business Council) स्थापना करण्यात आली आहे.

भारत-आसियानद्वारे जनतेचा विविध क्षेत्राच्या माध्यमातून संबंध घडवून आणण्यासाठी विविध विद्यार्थी हस्तांतरण, संसद सदस्य हस्तांतरण, माध्यम हस्तांतरण, तज्ज्ञ व्यक्तींची

भाषणे आदी कार्यक्रम राबविले जातात. 2013 च्या भारत आणि आसियान जोडणी सहकार्य समिती सभेनुसार भारत-म्यानमार-थायलंड राष्ट्रांना समुद्री, हवाई आणि महामार्गाने जोडण्याचे कार्य सुरु आहे. या तिन्ही राष्ट्रांदरम्यान होणारा मोटार वाहन करार शेवटच्या टप्प्यामध्ये असून, या प्रकल्पासाठी भारताकडून 1 अब्ज डॉलर्स कर्ज साहाय्याची घोषणा भारताकडून केली आहे. आसियान राष्ट्रांना वेगवेगळ्या क्षेत्रांसाठी निधीचा पुरवठा केला जातो, सर्व प्रकारचे निधी हे भारत-आसियान कृती कार्यक्रमाचा भाग आहे. आसियान-भारत दरम्यान कृती धोरणाच्या अंमलबजावणीसाठी भारताकडून 2009 मध्ये 50 दशलक्ष डॉलर्स मदतीची घोषणा करण्यात आली. यासाठी भारताने 2007 मध्ये 1 दशलक्ष डॉलर्स निधीची घोषणा केली. तो वाढून 2016-2017 मध्ये 5 दशलक्ष डॉलर्स इतका करण्यात आला आहे. 2007 च्या परिषदेमध्ये भारताकडून 5 दशलक्ष डॉलर्स निधीची घोषणा केली असून सद्यस्थितीत 1.97 दशलक्ष डॉलर्स किमतीच्या प्रकल्पांची अंमलबजावणी सुरु आहे. 2012 च्या आसियान परिषदेतील ठरावानुसार 2013 मध्ये भारत-आसियान केंद्राची (AIC-ASEAN India Centre) स्थापना केली आहे. या केंद्राद्वारे दोन्ही देशांदरम्यान संशोधन सल्ला आदिंबाबत धोरण ठरविण्यास मदत केली जाते.

**समकालीन भारत-आशियान संबंध :**

आग्नेय आशियातील 10 देशांच्या व्यापारी संघटनेशी म्हणजेच 'आसियान' (ASEAN-Association fo Southeast Asean Nation) भारताच्या संवाद भागीदारीला (ASEAN-India Paternship) 28 जानेवारी 2017 रोजी 25 वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यानिमित्त भारत व आसियान दरम्यान अनेक उच्चस्तरीय बैठकीसह अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. 28 जानेवारी 1992 रोजी सिंगापूर येथे आसियान देशाच्या 4 थ्या शिखर परिषदेत (4th ASEAN Summit) भारत व आसियान दरम्यान क्षेत्रीय संवाद भागीदारीचा निर्णय घेण्यात आला. तथापि डिसेंबर 1995 मध्ये भारत हा आसियानचा पूर्णत: संवाद भागीदार बनला. याबरोबरच 2012 मध्ये भारत-आसियानचा शिखर परिषद स्तरीय संवाद भागीदार (India - ASEAN Dialogue at summit level) झाला, याला 15 वर्षे पूर्ण झाली आहेत. 2012 मध्ये भारत-आसियान दरम्यान धोरणात्मक भागीदारी सुरु करण्यात आली याला 5 वर्षे पूर्ण झाली आहेत. संवाद भागीदारीची 20 वर्षे झाल्याच्या निमित्ताने नवी दिल्ली येथे 21-22 डिसेंबर 2012 रोजी परिषद आयोजित केली होती. ASEAN-India Partnership for peace and shared prosperity असा त्या परिषदेचा विषय होता. आज भारत आसियानचा 7 वा मोठा व्यापारी भागीदार देश आहे तर आसियान भारताची 4 थी मोठी व्यापारी संघटना आहे. आसियान (ASEAN-Association of south east Asian Nations) हा आग्नेय आशियातील दहा देशांची आंतरशासकीय

सहकार्य आणि आर्थिक एकात्मता सुविधा पुरविणारी व्यापारी संघटना आहे. इंडोनशिया, मलेशिया, फिलीपाईन्स, सिंगापूर व थायलंड या पाच देशांनी 8 ऑगस्ट 1967 रोजी 'आसियान' ची स्थापना केली. या पाच व्यतिरिक्त आसियानमध्ये सध्या कंबोडिया, म्यानमार, व्हिएतनाम, ब्रुनेई, लाओस या पाच देशांचा समावेश आहे. आसियान सदस्य देशांनी जगाच्या 35 टक्के भूभाग (4.4 दशलक्ष चौ. कि. मी.) 8.8 लोकसंख्या (625 दशलक्ष) व्यापलेला आहे. आसियान देश एकत्रितरित्या 6 वी मोठी अर्थव्यवस्था आहे. आसियान स्थापनेस 2017 मध्ये 50 वर्षे पूर्ण झाली आहेत. भारत-आसियान संवाद भागीदारी 1992 पासून सुरु होते. तर 1995 पासून भारत-आसियानचा पूर्ण संवाद भागीदार झाला. आर्थिक उदारीकरणाच्या दिशेने जागतिक पटलावर 1990 च्या दशकात जे बदल सुरु झाले त्याचा परिणाम म्हणून भारताचे आसियान देशासोबतचे संबंध अधिक मजबूत व बहुआयामी होत गेले. याच काळात भारतीय शासनाने 'लूक ईस्ट' हे धोरण सुरु केले. याच धोरणाचे अधिक गतिशील रुप म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे '□क्ट ईस्ट धोरण' होय. 2002 मध्ये नोम पेन्ह (कंबोडिया) येथे पहिली आसियान-भारत शिखर परिषद भरली. तेव्हापासून दरवर्षी ही परिषद आयोजित केली जाते. प्रत्येक आसियान-भारत परिषदेसह दोन्ही बाजूंच्या संबंधात वाढच होत गेली. 20 डिसेंबर 2012 रोजी नवी दिल्ली येथे झालेल्या परिषदेच्या स्मरणार्थ आसियान-भारत शिखर परिषदेत 'आसियान व्हिजन स्टेटमेंट' स्वीकारले गेले.

भारत आसियानचा संवाद भागीदार झाल्यापासून या देशांदरम्यानचे सहकार्य राजकीय व सुरक्षा या विषयापर्यंत वाढले आहे. आसियान सुरक्षा संवादासाठी आसियान क्षेत्रीय मंच आहे. भारत 1996 पासून आसियान क्षेत्रीय मंचच्या बैठकांना उपस्थित असतो व त्यांच्या प्रत्येक उपक्रमात सक्रीय सहभागी होतो. आसियान संरक्षण मंत्री बैठक ही सुरक्षा सल्लामसलत व सहकार्याविषयी सर्वोच्च यंत्रणा आहे. यामध्ये 10 आसियान सदस्यांसह कोरिया प्रजासत्ताक, रशिया, जपान, न्युझिलंड, ऑस्ट्रेलिया, चीन आणि भारत या देशांचा समावेश आहे. आग्नेय आशियातील शांतता व विकासाशी बांधिलकी दाखविण्यासाठी भारताने 8 ऑक्टोबर 2003 रोजी बाली (इंडोनेशिया) येथे पार पडलेल्या दुसऱ्या आसियान-भारत परिषदेत आग्नेय आशियामध्ये सहकार्य आणि मैत्री करार स्वीकारला. याचवेळी भारताने आंतरराष्ट्रीय दहशतवाद विरोधी सहकार्याच्या संयुक्त घोषणेवर सुध्दा स्वाक्षरी केली. 30 नोव्हेंबर 2004 रोजी व्हिएनियेने, लाओ पिडिआर येथील तिसऱ्या आसियान-भारत शिखर परिषदेत दोन्ही बाजूंच्या विकासासाठी ASEAN- India Partnership for Peace, Progress and shared Prosperity हे दीर्घकालीन नियोजन स्वीकारले गेले. तसेच कृती नियोजन आराखडा 2004-2010 सुध्दा विकसित करण्यात आला. 2009 मधील 7 व्या आसियान-भारत परिषदेत मागील सहभागी कार्यक्रमांविषयी समाधान व्यक्त करुन नवीन कृती नियोजन आराखडा

स्वीकारण्याचे ठरविण्यात आले. त्याप्रमाणे 8 व्या आसियान-भारत शिखर परिषदेत (ऑक्टोबर 2010 होनोई) आसियान-भारत कृती नियोजन-2015 स्वीकारण्यात आले. भारत-आसियान दरम्यानचे सहकार्य विस्तारण्यासाठी आपण स्वीकारलेले विविध करार / कागदपत्रे याविषयी शिफारस करण्यासाठी आसियान-भारत प्रतिष्ठित व्यक्ती गट निर्माण करण्यात आला. आसियान-भारत संवाद संबंध निर्मिती व आसियान चार्टरच्या स्वीकारानंतर भारताने जकार्ता येथे निवासी राजदूताची नेमणूक केली. एप्रिल-2015 मध्ये परराष्ट्र मंत्री सुषमा स्वराज यांनी आसियान-भारत धोरणात्मक सहभाग वाढविण्यासाठी स्वतंत्र असा असियान राजनयिक उपक्रम स्थापन केला. आसियान बहुपक्षीय विभाजन आसियान देशासाठी योजना आधारित वित्तीय सहाय्यता करते. 2009 च्या 7 व्या आसियान भारत शिखर परिषदेत भारताने आसियान-भारत सहकार्य निधीसाठी 50 दशलक्ष अमेरिकी डॉलर निधी दिला. संशोधन व विकास प्रकल्पांसाठी 6 व्या आसियान-भारत परिषदेत भारताने आसियान-भारत विज्ञान आणि तंत्रज्ञान विकास निधी निर्माण करुन त्यात 1 दशलक्ष डॉलरचे योगदान दिले. याच परिषदेत भारताने आसियान-भारत हरित निधी स्थापन करुन त्यासाठी 5 दशलक्ष डॉलरचे योगदान दिले. कृषी, विज्ञान आणि तंत्रज्ञान, अंतरा, पर्यावरण, हवामान बदल, मानव संसाधन विकास, क्षमता निर्मिती, नवीन व नवीनीकरणीय उर्जा, पर्यटन, नागरिकांमधील संपर्क इत्यादी विभिन्न योजनांसाठी भारत-आसियान देशांना मदत करत आहे. सप्टेंबर-2011 पासून आसियान सचिवालयाद्वारे 48 दशलक्ष डॉलरच्या विविध योजना पूर्ण करण्यात आल्या आहेत तर काही कार्यान्वित आहे. हो ची मिन्ह सिटी (व्हिएतनाम) येथे ट्रेकिंग, डेटा रिसेप्शन, प्रोसेसिंग सेंटर उभारण्याची प्रक्रिया सुरु आहे. पर्यटन, संस्कृती, शिक्षण तसेच वाहतूक व दळणवळण इत्यादींच्या सहकार्यासाठी भारत व पाच आसियान देश (कंबोडिया, म्यानमार, लाओस पिडिआर, थायलँड व व्हिएतनाम) यांच्यात 2000 मध्ये मेकाँग-गंगा सहकार्य उपक्रम सुरु करण्यात आला आहे. मेकाँग ही चीन, म्यानमार, लाओस, थायलंड, कंबोडिया व व्हिएतनाम या देशांमधून वाहणारी 4350 कि. मी. लांबीची आशियातील 7 व्या क्रमांकाची (लांबीला) मोठी नदी आहे. 9-13 नोव्हेंबर 2000 दरम्यान पहिली मंत्रिस्तरीय परिषद व्हिएनियेजने येथे पार पडली. 24 जुलै 2016 रोजी 7 वी मंत्रीस्तरीय परिषद पार पडली. आसियान-भारत दरम्यान 2009 पासून दिल्ली संवादाच्या आठ आवृत्त्या पार पडल्या. आठवी आवृत्ती 17-19 फेब्रुवारी 2016 दरम्यान नवी दिल्ली येथे पार पडली. 'ASEAN - Indian Relation : A New paradaigm' असा या आवृत्तीचा विषय होता. 8 ऑगस्ट 2016 रोजी ईशान्य पर्वतीय विद्यापीठ शिलाँग येथे भारत व सर्व आसियान देशांसाठी आसियान अभ्यास केंद्र म्हणून सुरु करण्यात आले.

फिलिपिन्सची राजधानी मनिला येथे 10-14 नोव्हेंबर 2017 दरम्यान 31 वी आसियान परिषद आणि 12 वी ईस्ट आशिया शिखर परिषद पार पडली. यावर्षी आसियानला स्थापन होऊन 50 वर्षे झाली आहेत. या दोन परिषदा फिलिपाईन्समध्ये पार पाडण्याची ही दुसरी वेळ आहे. बदलासाठी, जगाचा सहभाग हे या परिषदेचे घोषवाक्य होते. आसियान परिषदेत व्यापार व गुंतवणूक या विषयांना प्राधान्य होते तर ईस्ट आशिया / शिखर परिषदेमध्ये सागरी सुरक्षा, दहशतवाद, शस्त्रास्त्र प्रसारबंदी आणि स्थलांतर आदी विषय चर्चिले गेले. ऑस्ट्रेलिया, कॅनडा, चीन, युरोपियन कौन्सिल, जपान भारत, न्यूझिलंड, रशिया, दक्षिण कोरिया, अमेरिका आणि संयुक्त राष्ट्र हे संभाषण भागीदार (Dialogue Partner) म्हणून सहभागी झाले होते. तसेच आसियान + 3 या गटामध्ये आसियान राष्ट्रांसह चीन, जपान आणि दक्षिण कोरिया या देशांचा समावेश आहे. आसियान-भारत स्मृती परिषद 2018 नवी दिल्ली येथे 25-26 जानेवारी रोजी पार पडली. ''भागीदारी, मूल्य, समान ध्येय'' हे या परिषदेचे घोषवाक्य होते. या परिषदेला आसियान गटाच्या दहा राष्ट्रांचे प्रतिनिधी (ब्रुनेई, कंबोडिया, इंडोनेशिया, लाओस, मलेशिया, म्यानमार, फिलिपाईन्स, सिंगापूर, थायलंड आणि व्हिएतनाम) उपस्थित होते. या परिषदेत आसियान गट आणि भारत दरम्यान 'दिल्ली जाहीरनामा' हा सामंजस्य करार पार पडला. या व्यतिरिक्त आसियान-भारत दरम्यान 22-23 जानेवारी 2018 दरम्यान व्यवसाय आणि गुंतवणूक एक्सपोदेखील नवीन दिल्ली येथे पार पडले. प्रस्तुत ''दिल्ली जाहीरनामा'' अंतर्गत संबंधाचे मजबुतीकरण, दहशतवाद, सायबर सुरक्षा, बहुराष्ट्रीय गुन्हे, राजकीय आणि सुरक्षा सहकार्य, आर्थिक सहकार्य, भौतिक आणि डिजिटल जोडणी, सागर संसाधनांचे संवर्धन आणि शाश्वत वापर, सागरी सहकार्य, सूक्ष्म-लहान व मध्यम उद्योगांची निर्मिती आणि बाह्यावकाशाचा शांतीपूर्ण वापर करणे इत्यादी विविध विषयांवर एकवाक्यता झाली होती. आसियान संस्थेच्या विकासात अडथळा ठरणारी अनेक आव्हाने सुध्दा निर्माण झालेली आहे. आसियान राष्ट्रांमध्ये आर्थिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक आणि भाषिक वैविध्य असल्यामुळे आर्थिक एकात्मता साधण्याच्या दृष्टीने आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. आर्थिक विकासाबाबत आसियान राष्ट्रांमध्ये मोठ्या प्रमाणात वैविध्य आहे. हा या राष्ट्रांच्या विकासासाठी अडथळा ठरत आहे. कारण सिंगापूर आणि ब्रुनेई या राष्ट्रांचा प्रति व्यक्ती जीडीपी दर हा इतर राष्ट्रांपेक्षा खूप जास्त आहे. युरोपियन युनियन ही आसियानच्या तुलनेत उदारमतवादी लोकशाही बाजारधिष्ठित अर्थव्यवस्था आहे. याविरुध्द आसियानमध्ये एकाधिकारशाही, समाजवादी आणि लोकशाही अशा संमिश्र राष्ट्रांचा अंतर्भाव आहे. 2009 मध्ये आसियान आंतरशासकीय मानवाधिकार आयोग (ASEAN - Intergovernmental Commission on Human Rights) स्थापन करण्यात आला. त्याद्वारे 2012 मध्ये अहवाल तयार करण्यात आला. असे असले तरी या भागातील

स्थलांतरितांचा प्रश्न सुटला नाही, याउलट तो अजून भीषण झाला आहे. इस्लामिक स्टेट या दहशतवादी संघटनेचा प्रभाव वाढत आहे. रोहिंग्याच्या समस्येवर उपाय शोधण्यास आसियान अयशस्वी राहिली आहे. म्यानमार, थायलंड आणि लाओस या तीन राष्ट्रांमध्ये ड्रग्ज तस्करीला संस्थात्मक स्वरुप प्राप्त झाले आहे. जागतिक बँकेच्या 2016 च्या अहवालानुसार आसियानमधील 10 पैकी 4 राष्ट्रे वीज आयात करतात, यामध्ये वीज आयात करण्याचे प्रमाण जास्त आहे याशिवाय काही राष्ट्रांमध्ये मोठ्या प्रमाणात वीज निर्मिती होते तर काही राष्ट्रांना वीजेचा तुटवडा भासतो अशी वीजेच्याबाबत असंतुलित स्थिती वीज वैविध्य परिणाम आसियान राष्ट्रांमध्ये बघायला मिळते. इंडोनेशियातील LGBT (Lesbian, Gay] Bisexual & Transgender) समुहाच्या अधिकाराचा प्रश्न प्रक्षोभक बनला आहे. 2016 पासून देशामध्ये मोठ्या प्रमाणात आंदोलने झाली आहेत. थोडक्यात आसियान समूहाच्या व्यापक यशप्राप्तीसोबत अल्पप्रमाणातील अपयश तेवढेच नोंद घेण्यासारखे असल्याचे निदर्शनास येते.

**निष्कर्ष (Conclusion) :**

आसियान संघटना ही आंतरराष्ट्रीय स्तरावरील महत्त्वाची संघटना म्हणून उदयास आली असून भारताच्या आसियान देशांशी सागरी व भूसीमा संलग्न आहेत. महासत्ता म्हणून उदयाला येणाऱ्या भारताला या देशासोबत चांगले संबंध तसेच मोठ्या प्रमाणात व्यापार ठेवणे आवश्यक आहे. युरोपीय देशांसह अमेरिका स्वदेशीय नारा लावत असताना भारतीय आंतरराष्ट्रीय व्यापारात महत्त्वाच्या सेवा क्षेत्राच्या वाढीसाठी आसियान संघटनेचा मोठा फायदा होत आहे. भारत व पूर्वेकडील किंवा आग्नेयकडील देशांदरम्यान सदैव चांगले संबंध राहिले आहेत. पंतप्रधान गुजराल यांचे लूक इस्ट धोरण व मोदी यांचे '□क्ट इस्ट धोरण' हा त्याचाच भाग आहे. तथापि या राष्ट्रांकडून सुध्दा भारताला बराच फायदा आहेत. आशियाई क्षेत्रात आपले महत्त्व अबाधित राखण्यासाठी भारताला या देशांशी चांगले संबंध ठेवणे महत्त्वाचे आहे. तसेच चीनचा दक्षिण समुद्रावरचा दावा सांगण्यामुळे निर्माण झालेला तणाव व चीनची व्यापारातील स्पर्धा वाढत असल्यामुळे व्यापार आणि सागरी सुरक्षेत आसियान देशाचे भारताच्या दृष्टीने महत्त्व आहे. आसियान देशसुध्दा चीनच्या लष्करी बळाचे बळी होत असून त्यांना भारताच्या धोरणात्मक आधार आहे. सागरी व भूमार्ग वाहतूक, ऊर्जा, नैसर्गिक वायू, हायड्रोकार्बन इत्यादी बाबतीत आसियान देशाचे भारताला महत्त्व आहे. यामधूनच भारत आसियानचा चौथा मोठा व्यापारी भागीदार देश झाला आहे.

राष्ट्राला स्वत:च्या सर्वांगीण विकासासाठी शेजारी देशांसोबत चांगले राजनयिक संबंध असणे चांगलेच असते. आसियान देश हे छोटे व लष्करी आणि आर्थिकदृष्ट्या कमकुवत असल्यामुळे त्यांची वैयक्तिक ताकद कमी आहे. तेव्हा या देशांना चीनसारख्या बलाढ्य देशाविरोधात भारताचा सदैव आधार राहिला आहे, याचाच फायदा घेवून भारत कधी या

देशांवर दबावाचे धोरण अवलंबितो. परंतु चीनच्या विरोधात या देशांवर दबाव टाकणे योग्य होणार नाही. आसियान संघटना उपरोक्त अनेक विषयात प्रभावी कार्य करत असली तरी त्यांच्या अनेक मर्यादाही आहे. उदा. 1997 मधील आर्थिक कलह आसियान टाळू शकली नाही. म्यानमारच्या अधिकारशाही सत्तेबाबत सुध्दा आसियानची ठोस भूमिका नाही. तसेच आसियान देशांच्या जंगलातून होणारे बेकायदेशीर व्यापार, वृक्षतोड इत्यादीमुळे पर्यावरणाची होणारी हानी याबाबत आसियानने ठोस कार्य केलेले नाही. तथापि मर्यादित देशांचे आर्थिक व व्यापारी संघटन म्हणून ही संघटना युरोपियन संघाच्या बरोबरीची आहे. 1950 नंतर प्रथमच भारतामध्ये आसियान राष्ट्राचे प्रतिनिधी भारताच्या प्रजासत्ताक दिनी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित झाले. भारताच्या प्रजासत्ताक दिनासाठी एवढ्या मोठ्या प्रमाणात परकीय राष्ट्रप्रमुख येण्याची ही पहिलीच वेळ आहे. आसियान भारत परिषदेवर भारताच्या '□क्ट इस्ट' धोरणाचा प्रभाव दिसतो. कारण या परिषदेमध्ये विविध क्षेत्रांबाबत सामंजस्य करारावर एकवाक्यता झाली आहे. आसियान राष्ट्रांचे भारताशी संबंध दृढ झाल्यामुळे पाकिस्तान आणि चीनचा राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर होणारा अडथळा टाळता येण्यास अटकाव लागणार आहे. तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर दबावगट निर्माण करण्यास भारतास मदत मिळणार आहे. भौगोलिक आणि सांस्कृतिक पार्श्वभूमी समान असणाऱ्या आसियान राष्ट्रांचा भारतामधील उद्योगधंदे आणि रोजगार वृध्दीमध्ये निश्चितपणाने फायदा होणार आहे.

**संदर्भग्रंथ सूची (Bibliography):**


Shrivastav, Dhiraj (2007). *India's Foregin Policy.* Jaipur : ABD Publishers.

पाल, विनोद कुमार (2010). *आन्तरराष्ट्रीय राजनीतिक सम्बन्ध.* नई दिल्ली : डिस्कव्हरी पब्लिशिंग हाऊस प्रा. लि.

फडिया, बी. एल. (2017). *अन्तरराष्ट्रीय राजनिति सिध्दांत एवं समकालीन राजनीतिक मुद्दे.* आगरा : साहित्य भवन पब्लिकेशन्स.

देवळणकर, शैलेंद्र (2018). *मोदीकालीन परराष्ट्र धोरण.* पुणे : सकाळ प्रकाशन.

http://www.researchgate.net

http://www.asean.org.asean.external-relation.india

http://www.ipcs.org.issue-brief_pdf

http://www.journals.sagepub.com

http://www.mea.gov.in/portal/foreignRelation/India-ASEAN-Relations-August-2018.pdf

http://www.mea.gov.in/asianindia/20-years.html

http://www.m.economictimes.com

http://www.lowyinstitue.org